

**डॉ. आंबेडकर कॉलेज दीक्षाभूमी नागपूर**
**माजी विद्यार्थी समिती (डॉ.आंबेडकर कॉलेज दीक्षाभूमी नागपूर) व मालती इंगळे प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित**
**माजी विद्यार्थ्यांचा सत्कार व व्याख्यान अहवाल**
**दि. १ मे २०२४**

**डॉ.आंबेडकर कॉलेज दीक्षाभूमी नागपूर येथील माजी विद्यार्थी समिती व मालती इंगळे प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १ मे २०२४ माजी विद्यार्थ्यांचा सत्कार व व्याख्यान आयोजित करण्यात आले. 'आंबेडकरी चळवळीतील स्त्रियांचे योगदान: काल आज आणि उद्या' या विषयावर आधारित व्याख्यानासाठी** डॉ. सुनीता सावरकर (सहाय्यक प्राध्यापक इतिहास आणि प्राचिन भारतीय संस्कृती विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छ. संभाजीनगर (औरंगाबाद) उपस्थित होत्या. तसेच मा. छाया खोब्रागडे छाया खोब्रागडे ( संस्थापक संबूद्ध महिला संघटना) परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. राजेंद्र मुंढे ज्येष्ठ लेखक समीक्षक उपस्थित होते. डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. भूमी मेहरे उपस्थित होत्या. तसेच विचारमंचावर मालती इंगळे प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. ज्ञानेश्वर वाकोडे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर व तथागत गौतम बुद्ध यांच्या प्रतिमांना मान्यवरांच्या हस्ते माल्यार्पण करण्यात आले. तसे महाविद्यालयाच्या माजी प्राध्यापक,मराठी विभागातील स्मृतिशेष प्रा. मालती इंगळे यांना आदरांजली देण्यात आली. प्रा. मालती इंगळे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ आंबेडकर महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांकडून १ मे २०२४ रोजी या विशेष कार्यक्रमाचे दरवर्षी आयोजन करण्यात येते.
मागील वर्षी १ मे २०२३ रोजी, मा. प्रा. विमल थोरात या कार्यक्रमाच्या अध्यक्षा होत्या.

## कार्यक्रम पत्रिका










DR. AMBEDKAR COLLEGE



## माजी विद्यार्थी सत्कार

### १. डॉ. अशोक जांभूळकर

सध्या नागपूर आकाशवाणी वर मुख्य निवेदक या पदावर कार्यरत आहेत.



२. **मा. सुमेध कांबळे** हे डॉ. आंबेडकर कॉलेजचे विद्यापीठ प्रतिनिधी(UR) राहिलेत. गणतंत्र दिवस परेड दिल्ली येथे राजपथवर पथसंचालन करून महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले होते. अखिल भारतीय ॲडव्हान्स लीडरशिप कॅम्प मध्ये बेस्ट कॅडेट म्हणून सन्मान करण्यात आला. सायकलने नेपाळ-भूतान व नऊ राज्याचा प्रवास केला. राज्य तथा विभागीय विविध स्पर्धेत अनेक पुरस्कार प्राप्त. सध्या महाराष्ट्र महाराष्ट्र ऑफिसर फोरम मध्ये विभागीय कोषाध्यक्ष या पदावर कार्यरत




## ३. धम्मदिप किसन जामगडे

धम्मदिप किसन जामगडे हे आंबेडकर महाविद्यालया चे २००३-०४ या बॅचचे विद्यार्थी होते. सध्या ते हरिहर विद्यालय व क. महाविद्यालय पाराशिवनी येथे इंग्रजी विषयाचे उच्च माध्यमिक शिक्षक म्हणून कार्यरत आहे.

४. **सुलताना शेख-** चंद्रपूर जिल्यात एक यशस्वी उद्योजक म्हणून परिचित आहे. २००४-०५ ला आंबेडकर महाविद्यालयात शिकत होत्या.



## ५. वंदना मनोज इंगळे-

सध्या धनवटे कॉलेज नागपूर येथे असोसिएट प्रोफेसर आहेत. **1986 -1991 या काळात** डॉ. आंबेडकर कॉलेज दीक्षाभूमी नागपूर येथे शिकत होत्या.

डॉ. भूमी मेहरे प्राचार्या डॉ. आंबेडकर कॉलेज दीक्षाभूमी नागपूर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.



## ६. पंकज पाटील-

पंकज हे अमरावती जिल्ह्यातील वरुड तालुक्यातील पुसला या गावातून येतात. त्यांनी कला पदवीचे शिक्षण हे डॉ. आंबेडकर कॉलेज दीक्षाभूमी नागपूर येथून तर पदव्युत्तर पदवीचे शिक्षण हे मॉरिस कॉलेज नागपूर येथून पूर्ण केले. त्यानंतर त्यांना पत्रकारिता या क्षेत्राची आवड निर्माण झाली. त्यासाठी त्यांनी प्रंचड अभ्यास करत भारतातील अत्यंत प्रतिष्ठित अशा Indian Institute of Mass Communication and Journalism Amravati येथे प्रवेश मिळवला आणि याठिकाणी एक वर्ष मेहनत घेत मराठी पत्रकारितेत आपले शिक्षण पूर्ण केले. या दरम्यान, काम करत करताना त्यांना फिल्म मेकिंग या क्षेत्राची आवड निर्माण झाली आणि या दृष्टीने त्यांना या क्षेत्रात काम करण्याची संधीही मिळाली. लोकशाही वार्ता या वर्तमानपत्रातील सेवेनंतर त्यांनी नागपुरातील प्रसिद्ध मीडिया हाऊसमध्ये तब्बल 3 फिल्म प्रोड्यूसर म्हणून काम केलं.

याठिकाणी काम करत असताना त्यांनी राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक विषयांवर ज्वलंत भाष्य करणाऱ्या शासकीय आणि निमशासकीय क्षेत्रातील अनेक डॉक्युमेंटरी फिल्म्स तयार केल्या. हे कार्य करत असतानाच त्यांनी शेतकऱ्यांना केंद्र स्थानी ठेवत "कृषी कल्याण" या मराठी न्यूज चॅनलच्या माध्यमातून विदर्भातील शेतकऱ्यांना जागृत करण्याचं काम केलं. यावेळी त्यांनी अनेक शेतकऱ्यांची प्रेरणादायी प्रवासही समाजासमोर आणला.

यानंतर त्यांनी महाराष्ट्रात अत्यंत प्रसिद्ध असा डेली हंट या न्यूज चॅनलच्या एका प्रोजेक्टवर संपूर्ण महाराष्ट्राचे ट्रेनर आणि नागपूर क्लस्टर हेड म्हणूनही कार्य केले. या संपूर्ण कालावधीमध्ये पंकज यांनी एक स्क्रिप्ट राईटर, अँकर, व्हॉइस ओव्हर आर्टिस्ट आणि डॉक्युमेंटरी क्रिएटर म्हणून आपली एक वेगळी अशी ओळख निर्माण केली. अनेक डॉक्युमेंटरी फिल्म्स त्यांनी आपला आवाज दिलाय.





**कार्यक्रमाचे संचालन व आभार डॉ. विद्या चौरपगार राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी नागपुर यांनी केले. प्रास्ताविक भूमिका नितीन वाठोरे माजी विद्यार्थी आंबेडकर कॉलेज यांनी केले. मंचावर माजी प्राध्यापक डॉ. प्रतिभा सिरीया, मा. दर्शिका पाटील व इतर प्राध्यापक उपस्थित होते**

**प्रस्तुत परिसंवाद व माजी विद्यार्थी सन्मान कार्यक्रमाला प्रसिद्धी दिल्याबद्दल दैनिक वृत्तपत्रे, सकाळ, लोकमत, लोकसत्ता व पुण्यनगरी, लोकशाही वार्ता, महाराष्ट्र टाईम्स व बहुजन सौरभ चे मनपूर्वक धन्यवाद**



महिलांची संघटनात्मक एकजूटच संविधानाची मूल्ये बळकट करतील

डॉ. मालती वाकोडे व्याख्यानमालेतील सूर : 'आंबेडकरी चळवळीतील स्त्रियांच्या योगदानावर' चर्चा

NI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Nagpur-440..., Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648



पुण्यनगरी

संघटित महिला संविधानाची मूल्ये बळकट करतील

नागपूर : बाबासाहेबांनी पुकारलेल्या सामाजिक लढ्यात महिलांची संख्या पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त राहत असे. आंबेडकरी चळवळीचा आवाज बुलंद करण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर महिलांची स्वतंत्र, सक्षम संघटना उभी राहिली, तेव्हाच स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व ही संविधानातील मूल्ये समाजात खऱ्या अर्थाने रुजतील, असा सूर डॉ. आंबेडकर महाविद्यालयात आयोजित स्मृतिशेष डॉ. मालती इंगळे (वाकोडे) व्याख्यानमालेत पुढे आला.

दीक्षाभूमी येथील ॲड. दादासाहेब कुंभारे सभागृहात ज्येष्ठ समीक्षक डॉ राजेंद्र मुंढे यांच्या अध्यक्षतेत 'आंबेडकरी महिला चळवळ : काल, आज आणि उद्या' या विषयावर ही व्याख्यानमाला पार पडली. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास आणि प्राचीन संस्कृती विभागाच्या प्रा. डॉ. सुनीता सावरकर, प्राचार्य डॉ. भुवनेश्वरी मेहरे, डॉ. दर्शिका पाटील, सामाजिक कार्यकर्त्या छाया खोब्रागडे व अधिकारी सुमेध कांबळे यांनी विचार व्यक्त केले. यावेळी माजी विद्यार्थी व आकाशवाणीचे निवृत्त उद्घोषक अशोक जांभूळकर, डॉ. वंदना इंगळे मेश्राम, समता सैनिक दलाचे राष्ट्रीय प्रमुख सुनील सारिपुत्त, पंकज पाटील, मॅडम सुलताना, धम्मदीप जामगडे यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक डॉ. ज्ञानेश्वर इंगळे यांनी, संचालन प्रा. विद्या धोरपगार यांनी तर आभार संघर्ष डहाके यांनी मानले.

Smart Nagpur Edition
May 10, 2024 Page No. 10
Powered by: erelego.com

# महिलांची संघटनात्मक एकजूटच संविधानाची मूल्ये बळकट करतील

## डॉ. मालती वाकोडे व्याख्यानमालेतील सूर : 'आंबेडकरी चळवळीतील स्त्रियांचे योगदान' यावर चर्चा

**लोकशाही वार्ता / नागपूर**

बाबासाहेबांनी पुकारलेल्या सामाजिक लढ्यात महिलांची संख्या पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त राहत असे. अलीकडच्या काळाचा विचार करता आंबेडकरी चळवळीचा आवाज बुलंद करण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर महिलांची स्वतंत्र, सक्षम संघटना उभी राहावी. तेव्हाच स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व ही संविधानातील मुल्ये समाजात खऱ्या अर्थाने रुजतील, असा सूर डॉ. आंबेडकर महाविद्यालयात आयोजित स्मृतिशेष डॉ. मालती इंगळे (वाकोडे) व्याख्यानमालेत पुढे आला.



दीक्षाभूमी येथील ॲड. दादासाहेब कुंभारे सभागृहात स्मृतिशेष डॉ. मालती इंगळे (वाकोडे) व्याख्यानमालेत ज्येष्ठ समीक्षक डॉ राजेंद्र मुंढे यांच्या अध्यक्षतेत 'आंबेडकरी महिला चळवळ : काल, आज आणि उद्या' या विषयावर चर्चा झाली. यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास आणि प्राचीन संस्कृती विभागाच्या प्रा. डॉ. सुनीता सावरकर, प्राचार्य डॉ.भुवनेश्वरी मेहरे, डॉ. दर्शिका पाटील, सामाजिक कार्यकर्त्या छाया खोब्रागडे, अधिकारी सुमेध कांबळे यांनी विचार व्यक्त केले. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समीक्षक डॉ. राजेंद्र मुंढे होते.

डॉ. सुनीता सावरकर म्हणाल्या, अस्पृश्यतेचे चटके सोसताना महिलानी फार पूर्वीपासून संघर्ष पुकारला होता. बाबासाहेबांच्या सामाजिक चळवळीने महिलांना अस्तित्वाचे भान दिले. महिलांच्या एका पिढीने अन्यायाविरूद्ध संघर्ष करीत आपली भावी पिढी शिक्षित केली. अशाप्रकारे महिलांची चळवळ एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होत आहे. छाया खोब्रागडे यांनी आंबेडकरी विचारांचे संवर्धन करणारी महिलांची राष्ट्रीय पातळीवर संघटना उभी राहावी, असे मत व्यक्त केले. सद्यस्थितीत स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व ही संविधानातील मूल्ये समाजात खऱ्या अर्थाने रुजविण्यासाठी व ही चळवळ नव्या जोमाने पुढे जाणेसाठी पुरुषाने महिलांच्या खांद्याला खांदा लावून आंबेडकरी महिला चळवळ वृद्धिंगत करणे काळाची गरज आहे, असे डॉ. मुंढे म्हणाले. डॉ. मेहरे, डॉ. पाटील, कांबळे यांनी डॉ. वाकोडे यांच्या आठवणींना उजाळा दिला. निवृत्त उद्?घोषक अशोक जांभूळकर, डॉ. वंदना इंगळे मेश्राम, समता सैनिक दलाचे राष्ट्रीय प्रमुख सुनील सारीपुत्त, पंकज पाटील, सुलताना, धम्मदीप जामगडे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक डॉ. ज्ञानेश्वर इंगळे यांनी केले. संचालन प्रा. विद्या धोरपगार यांनी केले, तर आभार संघर्ष डहाके यांनी मानले.

---

# महिलांची एकजूटच संविधानाची मुल्ये करतील बळकट

## डॉ. मालती वाकोडे व्याख्यानमालेतील सूर : आंबेडकरी चळवळीतील स्त्रियांच्या योगदानावर चर्चा

**सकाळ वृत्तसेवा**

नागपूर, ता. ५ : बाबासाहेबांनी पुकारलेल्या सामाजिक लढ्यात महिलांची संख्या पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त राहत असे. अलीकडच्या काळाचा विचार करता आंबेडकरी चळवळीचा आवाज बुलंद करण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर महिलांची स्वतंत्र, सक्षम संघटना उभी राहावी. तेव्हाच स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व ही संविधानातील मुल्ये समाजात खऱ्या अर्थाने रुजतील, असा सूर डॉ. आंबेडकर महाविद्यालयात आयोजित स्मृतिशेष डॉ. मालती इंगळे (वाकोडे) व्याख्यानमालेतून पुढे आला.



नागपूर : व्याख्यानमालेत सन्मान करण्यात आलेल्या माजी विद्यार्थ्यांसह प्रमुख पाहुणे डॉ. सुनीता सावरकर यांच्यासह इतर.

दीक्षाभूमी येथील ॲड. दादासाहेब कुंभारे सभागृहात बुधवारी (ता.१) स्मृतिशेष डॉ. मालती इंगळे (वाकोडे) व्याख्यानमालेत 'आंबेडकरी चळवळीतील स्त्रियांचे योगदान : काल आज आणि उद्या' या विषयावर चर्चा झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास आणि प्राचीन संस्कृती विभागाच्या प्रा. डॉ. सुनीता सावरकर, प्राचार्य डॉ. भुवनेश्वरी मेहरे, डॉ. दर्शिका पाटील, सामाजिक कार्यकर्त्या छाया खोब्रागडे, अधिकारी सुमेध कांबळे यांनी विचार व्यक्त केले. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाक्षक डॉ. राजेंद्र मुंढे होते.

डॉ. सावरकर म्हणाल्या, अस्पृश्यतेचे चटके सोसताना महिलानी फार पूर्वीपासूनच संघर्ष पुकारला होता. बाबासाहेबांच्या सामाजिक चळवळीने महिलांना अस्तित्वाचे भान दिले. महिलांच्या एका पिढीने अन्यायाविरुद्ध संघर्ष करीत आपली भावी पिढी शिक्षित केली.

अशाप्रकारे महिलांची चळवळ एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होत आहे. छाया खोब्रागडे यांनी आंबेडकरी विचारांचे संवर्धन करणारी महिलांची राष्ट्रीय पातळीवर संघटना उभी राहावी असे मत व्यक्त केले. डॉ. मुंढे यांनी महिलांच्या खांद्याला खांदा लावून पुरुषांनी चळवळीला बळ देण्याची गरज व्यक्त केली. डॉ. मेहरे, डॉ. पा
कांबळे यांनी डॉ. वाकोडे यांच
आठवणींना उजाळा दिला. य
माजी विद्यार्थी व आकाशवाण
निवृत्त उद्घोषक अशोक
जांभूळकर, डॉ. वंदना इंगळे
समता सैनिक दलाचे राष्ट्रीय
सुनील सारिपुत्त, पंकज पाट
मॅडम सुलताना, धम्मदीप ज
यांचा सत्कार करण्यात आ
प्रास्ताविक डॉ. ज्ञा. शं इंग
केले. संचालन प्रा. विद्या
यांनी तर आभार संघर्ष ड
मानले.